# शिवाजी विद्यापीठामार्फत आविष्कार संशोधन महोत्सव २०२१-२२ चे आयोजन

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मार्फत आविष्कार संशोधन महोत्सव २०२१-२२ चे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक आपले संशोधन सादर करू शकतात. कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर यावर्षी हा महोत्सव **ऑनलाईन** माध्यमातून घेण्यात येणार आहे.

महोत्सवामध्ये सहभागाचे पुढीलप्रमाणे चार स्तर आहेत: 1) पदवी (UG) 2) पदव्युत्तर (PG) 3) एम.फिल./ पीएच. डी. साठी प्रवेशीत असणारे विद्यार्थी (PPG) आणि 4) एम.फिल./ पीएच. डी. साठी प्रवेशीत असणारे महाविद्यालयीन व विद्यापीठीय मान्यताप्राप्त शिक्षक (TH).

या महोत्सवामध्ये सादर करण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पांची विभागणी पुढील सहा शाखांमध्ये करण्यात येणार आहे: 1) Humanities, Language, Fine Arts 2) Commerce, Management, Law 3) Pure Sciences 4) Agriculture and Animal Husbandry 5) Engineering and Technology आणि 6) Medicine and Pharmacy. मात्र कोणत्याही शाखेमध्ये शिकत असणारा विद्यार्थी/शिक्षक वरील कोणत्याही शाखेअंतर्गत आपले संशोधन सादर करू शकतो.

पदवी स्तरासाठी (UG) प्रथम फेरी जिल्हास्तरावर घेण्यात येणार आहे. कोल्हापूर, सांगली, व सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी या फेरीचे आयोजन अनुक्रमे द न्यू कॉलेज कोल्हापूर, विलिंग्डन कॉलेज सांगली व दहिवडी कॉलेज दहिवडी या यजमान महाविद्यालयांमार्फत आयोजित करण्यात आले आहे. प्रथम फेरीतून निवडलेल्या पदवी स्तरातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठस्तरीय फेरीचे आयोजन संगणकशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेमार्फत आयोजित करण्यात आले आहे.

इतर तीन स्तरांसाठी (PG/PPG/TH) महोत्सव थेट विद्यापीठस्तरावरच संगणकशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेमार्फत आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवामध्ये एका महाविद्यालयातून/अधिविभागातून प्रत्येक शाखेसाठी व प्रत्येक स्तरामध्ये जास्तीत जास्त दोन विद्यार्थी सहभागी होऊ शकतात व त्याची नोंदणी **संबंधित महाविद्यालय/अधिविभाग यांनी** विद्यापीठाने उपलब्ध केलेला Google Form च्या माध्यमातून करावयाची आहे. महाविद्यालयांनी त्याच्या विद्यार्थ्यांची नोंदणी विद्यापीठाने महाविद्यालयाला दिलेल्या अधिकृत ई-मेल द्वारेच करावयाची आहे. विद्यार्थी वैयक्तिकरित्या नोंदणी करू शकणार नाहीत.

नोंदणी करत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाची संक्षिप्त माहिती (One page summary in PDF format) व प्रकल्प सादरीकरणाचा 3 ते 5 मिनिटाचा व 1 GB मर्यादेचा व्हिडिओ अपलोड करणे आवश्यक आहे. सदर One page summary व व्हिडिओ मध्ये **विद्यार्थ्यांच्या किंवा त्याच्या महाविद्यालयाच्या/अधिविभागाच्या नावाचा उल्लेख नसावा**. नोंदणीसाठीची लिंक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/bcud/Avishkar) लवकरच उपलब्ध करण्यात येईल.

**नोंदणी करण्याची अंतिम तारीख ०९ फेब्रुवारी, २०२२ आहे.**

या महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील व आविष्कार समन्वयक डॉ. एस. बी. महाडिक यांनी केले आहे.